मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सादर

## महापालिकेचा 2026-27 या आर्थिक वर्षांचा पाच हजार 655 कोटी 73 लाख रुपयांचा अर्थसंकल्प सादर झाला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चार वर्षांची प्रशासकीय राजवट संपल्यानंतर लोकप्रतिनिधींचा पहिलाच पिंपरी – चिंचवड महापालिकेचा २०२६-२७ या आर्थिक वर्षांचा मूळ पाच हजार ६५५ कोटी ७३ लाख तर केंद्र, राज्य सरकारच्या पुरस्कृत योजनांसह नऊ हजार ३२२ कोटी १७ लाख रुपयांचा अर्थसंकल्प शनिवारी सादर झाला. मालमत्ता कर आणि पाणीपट्टीत कोणतीही करवाढ-दरवाढ करण्यात आली नाही.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी नवनिर्वाचित स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्याकडे अर्थसंकल्प सादर केला. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांच्यासह स्थायी समितीचे सदस्य आणि अधिकारी उपस्थित होते.

हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा दस्तऐवज नसून शहराच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासाचा ठोस आराखडा आहे. पायाभूत सुविधा, पर्यावरण, पाणीपुरवठा, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकास यांना प्राधान्य देण्यात आले आहे. महिलांसाठी जेंडर बजेट, दिव्यांगांसाठी कल्याणकारी तरतूद, शहरी गरीबांसाठी मोठा निधी आणि नागरिकांच्या सूचनांचा समावेश यामुळे हा अर्थसंकल्प लोकाभिमुख व उत्तरदायी प्रशासनाचे प्रतीक असल्याचा विश्वास आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केला.



### ५ हजार ६९० कोटींच्या ठेवी

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण एक हजार ४५५ आणि इतर व राखीव निधी अशा ५ हजार ६९० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. तर ५५९ कोटी ११ लाखांचे कर्ज आहे. त्यात हरित कर्जरोखे २००, महापालिका कर्जरोखे २०० आणि जागतिक बँकेचे १५९ कोटी ११ लाख रुपयांचे कर्ज आहे.

### मागील पाच वर्षांतील अर्थसंकल्पाचा लेखाजोखा

- » सन २०२१-२२ – सात हजार १३९ कोटी
- » सन २०२२-२३ – सहा ४९७ कोटी
- »•सन २०२३-२४ – सात हजार १२७ कोटी
- » सन २०२४-२५ – आठ हजार ६७६ कोटी
- » सन २०२५-२६ – नऊ हजार ६७५ कोटी

### अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

» विविध विकास कामांसाठी एक हजार १८६ कोटी, स्थापत्य विशेष योजना ४३६ कोटी ९४ लाख, महापौर निधी ५० कोटी, शहरी गरिबांसाठी एक हजार ९५३ कोटी, महिलांच्या विविध योजनासाठी ९९ कोटी, अपंग कल्याणकारी योजनासाठी ६८ कोटी ३० लाख रुपये, पाणी पुरवठा विषयक भांडवली कामासाठी १५५ कोटी ७३ लाख, पीएमपीएमएलसाठी ४०० कोटी, भूसंपादनाकरिता १०० कोटी, अतिक्रमण निर्मूलन व्यवस्थेसाठी दहा कोटी, स्मार्ट सिटीसाठी ५० कोटी, अमृत योजनेसाठी ५४ कोटी ४५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### क्षेत्रीय विकासासाठी भरीव तरतूद

- » अ क्षेत्रीय कार्यालय – ६ कोटी २९ लाख
- » ब क्षेत्रीय कार्यालय – ११ कोटी ४९ लाख
- » क क्षेत्रीय कार्यालय – १० कोटी २५ लाख
- » ड क्षेत्रीय कार्यालय – ११ कोटी ४४ लाख
- » इ क्षेत्रीय कार्यालय – ३ कोटी ७० लाख
- » फ क्षेत्रीय कार्यालय – ९ कोटी ३० लाख
- » ग क्षेत्रीय कार्यालय – ५ कोटी २८ लाख
- » ह क्षेत्रीय कार्यालय – ७ कोटी ९२ लाख

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी अभिषेक बारणे यांची निवड

## स्थायी समितीच्या विशेष सभेत बिनविरोध निवड जाहीर; सर्वपक्षीय नेत्यांकडून अभिनंदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी आज पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे स्थायी समितीची विशेष सभा पार पडली. सदर विशेष सभेत स्थायी समिती सभापती पदासाठीची निवडणूक प्रक्रिया पार पडली.



स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन अर्जांची छाननी करण्यात आली असता अभिषेक बारणे यांचा एकमेव अर्ज वैध ठरला. इतर कोणताही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे अभिषेक बारणे यांची स्थायी समिती सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी एम.जे.प्रदीप चंद्रन यांनी जाहीर केले.

निवडणूक कार्यालयास आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप,मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविणकुमार जैन, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, विशेष अधिकारी किरण गायकवाड तसेच महापालिका विविध विभागप्रमुख उपस्थित होते,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले.

या निवडीनंतर महापौर रवि लांडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह नगरसदस्य व नगरसदस्या यांनी सभापती अभिषेक बारणे यांचे अभिनंदन केले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 3 ते 5 मार्चदरम्यान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

## 43 देशांतील 116 चित्रपटांचा सहभाग; जागतिक चित्रपटसृष्टीची रंगतदार मेजवानी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी आणि गाथा फिल्म सोसायटी यांच्या वतीने तसेच सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई, भारतीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्था, पुणे (एफटीआयआय) यांच्या सहकार्याने आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे ३ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या जागतिक दर्जाच्या चित्रपट महोत्सवास शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड शहरात आयोजित करण्यात येत असलेला हा महोत्सव एक भव्य, वैविध्यपूर्ण आणि आशयघन सांस्कृतिक सोहळा ठरणार असून यंदाच्या महोत्सवात तब्बल ४३ देशांमधील ११६ चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. जागतिक स्तरावरील दर्जेदार कलाकृतींचा आस्वाद शहरातील चित्रपटप्रेमींना या महोत्सवाच्या माध्यमातून घेता येणार असून हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' हा शहराच्या सांस्कृतिक समृद्धीत भर घालणारा आणि नव्या विचारांना चालना देणारा उपक्रम ठरणार आहे.

### महोत्सवात चित्रपटाचे विशेष प्रदर्शन

» 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' या मराठी चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' मध्ये ग. दि. माडगूळकर सभागृह येथे ५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आले आहे. मराठी माध्यमातील शिक्षणव्यवस्था, बदलते सामाजिक वास्तव आणि स्थानिक भाषेतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे. मराठी भाषा, शिक्षण आणि सांस्कृतिक ओळख यांचा परस्परसंबंध प्रभावीपणे उलगडणारा हा चित्रपट महोत्सवातील विशेष आकर्षण ठरणार असून चित्रपटप्रेमींना मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनाच्या दृष्टीने चिंतन करण्याची संधी उपलब्ध करून देणार आहे.

> 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' हा केवळ चित्रपट प्रदर्शनाचा कार्यक्रम नसून विविध देशांतील आशयघन आणि दर्जेदार कलाकृतींच्या माध्यमातून सांस्कृतिक संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. यंदा ४३ देशांतील ११६ चित्रपटांची निवड करण्यात आली असून लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन आणि दीर्घपट अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. समाजप्रबोधन, महिला सक्षमीकरण, पर्यावरण, तंत्रज्ञान, मानवी मूल्ये आणि जागतिक शांतता अशा विषयांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. विशेषतः 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' पुरस्काराच्या माध्यमातून चित्रपट क्षेत्रातील महिलांच्या योगदानाचा गौरव करण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा..
>
> - दत्ता गुंड, संस्थापक, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी

### ५ मार्च रोजी पारितोषिक वितरण समारंभ

» पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ अंतर्गत बुधवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी चित्रपट महोत्सवातील विविध स्पर्धा विभागांतील उत्कृष्ट चित्रपटांना सन्मानित करून पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. महोत्सवादरम्यान प्रदर्शित करण्यात आलेल्या लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट या विविध गटांमधील निवडक कलाकृतींना सन्मानित करण्यात येणार असून 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' या विशेष पुरस्काराचाही यावेळी प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभास चित्रपटसृष्टीतील मान्यवर, परीक्षक तसेच सहभागी दिग्दर्शक व निर्माते उपस्थित राहणार आहेत.

> 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' हा आपल्या शहराच्या सांस्कृतिक समृद्धीला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. तब्बल ४३ देशांतील ११६ दर्जेदार चित्रपटांच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि मानवी मूल्यांवर आधारित आशयपूर्ण कलाकृती नागरिकांना पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नव्या विचारांना दिशा मिळेल, तसेच विशेषतः महिला दिग्दर्शकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी ठरेल. शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या विनामूल्य महोत्सवाचा लाभ घ्यावा.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# सांगवीत पवनाथडी जत्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## झणझणीत मराठमोळ्या जेवणाची मेजवानी; हस्तकला, खरेदी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत

**पिंपरी | प्रतिनिधी**





अनेक शोभेच्या वस्तू, पारंपरिक आधुनिक कृत्रिम दागिने, हस्तकलेच्या बॅगा, पर्स, गृहोपयोगी वस्तू, उन्हाळी पदार्थ, विविध मसाले, लोणचे, पापड, चटण्या नाश्त्याचे विविध पदार्थ व जेवणासाठीही अस्सल मराठमोळे, शाकाहारी, मांसाहारी पदार्थ अशा वैविध्यपूर्णतेने पवनाथडी जत्रा सजली आहे. या जत्रेत झणझणीत जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांची झुंबड उडत आहे.

सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर रविवारपर्यंत नागरिकांना जत्रेचा आनंद घेता येणार आहे. जत्रेत विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची भरपूर प्रमाणात दुकाने, स्टॉल्स आहेत. याशिवाय सायंकाळी नागरिकांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. महिलांना रोजच्या वापरासाठी लागणारे साहित्य व इतर साहित्य उपलब्ध आहे.

टॉप, लेगिन्स, पर्स, बॅगांची खरेदी महिला करत आहेत. स्वतःच्या खरेदी बरोबर आपल्या घरासाठी मिरल, कॉफ पेंटिंग्स, वारली पेंटिंग्स, वाल पेंटिंग्स, की होल्डर विणलेले तोरण, ताटावरचे विणलेले रुमाल अशा महिलांनी स्वतः बनविलेल्या वस्तू व इतर गृहोपयोगी वस्तू उपलब्ध आहेत. जेवणासाठी विविध मसाले आहेत. शुभेच्छापत्रे, लहान मुलांची खेळणी, सौंदर्यप्रसाधने, सुखी मासळी विविध वस्तू जत्रेत उपलब्ध आहेत.

### नागरिकांना घेता येणार यांचा आस्वाद

» मनसोक्त खरेदी झाल्यावर ताजेतवाने होण्यासाठी नाश्त्याचे अनेक पदार्थ खवय्यांना खुणवतात. उडीद वडा, इडली सांबर, पावभाजी, आप्पे, डोसा, सँडविच, शेगाव कचोरी आणि अगदी भेळ, वडापावसारखे विविध पदार्थ आहेत. चुलीवरच्या मराठमोळ्या झणझणीत जेवणाची लज्जत चाखण्यासाठी शाकाहारी व मांसाहारी जेवणाचे स्टॉल सज्ज आहेत. वरण-भात, झुणका भाकरी, वांग्याचे भरीत, भाकरी, मासवडी या स्पेशल कोल्हापुरी पद्धतीचे जेवण, खानदेशी मांडेसोबत आमटी भात, भाजणीचे थालीपीठ, चिकन बिर्याणी, चिकन वडे, कोंबडीचा रस्सा, पापलेट फाय, सुरमई फाय, कोळंबी पकोडे, सुरमई करी, अंडा करी, खिमा भजी, खिमा पाव, खिमा करंजी, हे सारे पदार्थ खवय्यांना तृप्त करणार आहेत. सोलकढी, खपली गव्हाची खीर, सुरळीची वडी, कोथिंबीर वडी, मंचुरियन, पुरणपोळी, गुळपोळी, उकडीचे मोदक या प्रसिद्ध पदार्थांची चवही येथे चाखायला मिळणार आहे.

# कामांच्या टेंडर बाबत आयुक्तांनी घेतला मोठा निर्णय !

## 15 मार्चपर्यंत देयके सादर करण्याची मुदत; त्यानंतर बिल मंजूर होणार नाही

**पुणे | प्रतिनिधी**

'महापालिकेच्या मुख्य विभागाने आणि क्षेत्रीय कार्यालयांच्या पातळीवर एक मार्चनंतर कोणत्याही नवीन कामाची निविदा काढण्यात येऊ नये. तसेच, कामांचे नव्याने कार्यादेश दिले जाणार नाहीत,' असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले आहे. आर्थिक वर्ष संपताना घाईने काढण्यात येणाऱ्या निविदांना त्यामुळे आळा बसणार आहे. या निर्णयांमुळे महापालिकेतील 'माननीयां'ची 'ठेकेदारां'ची अडचण होणार आहे.

महापालिकेच्या आर्थिक वर्षाची मुदत संपण्यासाठी केवळ एक महिना शिल्लक राहिला असल्याने मार्च महिन्यात मोठ्या संख्येने विविध कामांसाठी निविदा काढून कामाचे आदेश दिले जातात. अखेरच्या महिन्यात काढलेल्या निविदांमध्ये अनेकदा गैरव्यवहारचे प्रकार घडतात. मात्र यामध्ये प्रशासनावर त्याचे संपूर्ण खापर फोडले जाते. या चुकीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी कठोर भूमिका घेतली आहे.



### १५ मार्चनंतर देयके स्वीकारली जाणार नाहीत

**» २०२५-२६ या आर्थिक वर्षात पूर्ण झालेल्या कामांची सर्व देयके १५ मार्चपर्यंत मुख्य लेखा व वित्त विभागाकडे सादर करावीत, असे आदेशात नमूद आहे. त्यानंतर कोणतीही देयके स्वीकारली जाणार नाहीत. शिल्लक निधीतून नवीन कामे लावणे किंवा देयके काढण्याचे प्रकार टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. आर्थिक शिस्त पाळली जावी आणि निधीचा योग्य वापर व्हावा, यावर प्रशासनाने भर दिला आहे.**

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या बाबतचे आदेश काढले असून, आदेशाची कडक अंमलबजावणी करण्याच्या सूचना आयुक्तांनी महापालिकेच्या सर्व विभागांच्या प्रमुखांना, क्षेत्रीय कार्यालयांच्या सहाय्यक आयुक्तांना दिल्या आहेत. याकडे दुर्लक्ष केल्यास आणि मनमानी करण्याचा प्रयत्न केल्यास शिफारस केलेल्या कामाचे बिल काढले जाणार नाही. तसेच, त्यासाठी आवश्यक असलेला निधी कोणत्याही परिस्थितीत प्रशासनाकडून मंजूर केला जाणार नाही, असे आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले आहे.

आयुक्तांनी काढलेल्या आदेशामुळे महापालिकेत माननीयांसह अधिकारी, ठेकेदारांची अडचण झाली असून निविदा मान्य होऊन कार्यादेश हातात पडावा, यासाठी जोरदार धावपळ सुरू आहे.

महापालिकेचे आर्थिक वर्ष एप्रिल ते मार्च असे असते. मार्चअखेर जवळ आल्याने दर वर्षी फेब्रुवारी, मार्च या दोन महिन्यांमध्ये महापालिकेच्या सर्व विभागांमध्ये कामे मंजूर करून घेण्यासाठी गर्दी होते. गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या विविध विभागांमध्ये गर्दी होण्यास सुरुवात झाली आहे. नवीन कामांच्या निविदा काढणे, निविदा मान्य झाल्यानंतर कामे सुरू करण्याची परवानगी देणारे आदेश काढणे, काम पूर्ण झालेल्या तसेच प्रगतिपथावर असलेल्या कामांची देयके मंजूर करुन घेण्यासाठी महापालिकेत अधिकारी, ठेकेदार यांची गर्दी होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

### १ मार्चनंतर नवीन निविदांना बंदी

**» पुणे महानगरपालिकामध्ये १ मार्चनंतर कोणत्याही नवीन कामासाठी निविदा काढू नयेत तसेच नव्याने कार्यादेश देऊ नयेत, असा स्पष्ट आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिला आहे. आर्थिक वर्षअखेरीस घाईगडबडीत मंजूर होणाऱ्या कामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव राहू नये आणि गैरप्रकारांना आळा बसावा, हा या निर्णयामागील उद्देश आहे. सर्व विभागप्रमुख आणि क्षेत्रीय कार्यालयांना आदेशाची कडक अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

### उल्लंघन झाल्यास निधी रोखणार

**» आयुक्तांनी स्पष्ट केले आहे की आदेशाचे उल्लंघन करून कामे मंजूर करण्याचा प्रयत्न झाल्यास त्या कामांचे बिल काढले जाणार नाही. तसेच आवश्यक निधीही मंजूर केला जाणार नाही. आर्थिक वर्षअखेरीस होणारी अनावश्यक गर्दी, धावपळ आणि संशयास्पद व्यवहार रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. या निर्णयामुळे महापालिकेत अधिकारी व ठेकेदारांमध्ये हालचाल वाढली असून आर्थिक शिस्तीचा संदेश देण्यात आला आहे.**

# ई-चलनविरोधात वाहतूकदारांचे गुरुवारपासून बेमुदत आंदोलन

## शाळा बस, रिक्षा, टेम्पो आणि मालवाहतूकदार या संपात सहभागी होणार, आंतरराज्य सेवा विस्कळीत होण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील खासगी बस, रिक्षा, टॅक्सी आणि मालवाहू वाहतूकदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी 'महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटी'च्या वतीने बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती कमिटीचे प्रसन्न पटवर्धन, बाबा शिंदे आणि नितीन पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे आंदोलन दि. ५ मार्चपासून बेमुदत होणार असून या आंदोलनामुळे शाळा बस, कर्मचारी वाहतूक आणि आंतरराज्य बस सेवा विस्कळीत होण्याची शक्यता असून, याचा मोठा फटका सामान्य जनतेला बसणार आहे.




सरकारकडून रस्ते विकासाच्या नावाखाली इंधनावरील अधिभार आणि टोल अशा दुहेरी करांची वसुली केली जात आहे. खराब रस्त्यांमुळे होणाऱ्या अपघातांना कंत्राटदारांऐवजी वाहनचालकांना जबाबदार धरले जात असल्याचा आरोप पटवर्धन यांनी यावेळी केला. त्याचबरोबर आरटीओकडून फिटनेस सर्टिफिकेटसाठी केली जाणारी सक्ती, ई-चलन प्रणालीतील जाचक अटी आणि सीमा तपासणी नाक्यांवरील बेकायदा वसुली यांमुळे वाहतूकदार हवालदिल झाले आहेत.

शासनाने दुहेरी टोल आकारणी आणि अन्यायी कर प्रणाली रद्द करावी, वाहनधारकांवरील 'रेट्रो फिटमेंट'ची सक्ती थांबवावी, ई-चलन प्रणालीतील त्रुटी दूर करून ५० टक्के दंडाची अट रद्द करावी तसेच, वाहतूक क्षेत्रातील तक्रारींच्या निवारणासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था स्थापन करावी आदि मागण्या असल्याचे पवार यांनी सांगितले. या संपात सुरुवातीला शाळा बस आणि प्रवासी गाड्या सहभागी होणार आहेत. तर पुढील टप्प्यात दूध आणि इंधन टँकरही सामील होण्याची शक्यता आहे. १५ दिवसांपूर्वीच या आंदोलनाची सूचना प्रशासनाला देण्यात आली असून, सरकारने त्वरित सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा बाबा शिंदे यांनी यावेळी दिला.

### वाहतूकदारांचा बेमुदत आंदोलनाचा इशारा

**» राज्यातील शाळा बस, कर्मचारी वाहतूक, टुरिस्ट कॅब, रिक्षा, टेम्पो व मालवाहतूक वाहनांवरील कर, टोल आणि ई-चलन नियमांविरोधात ५ मार्चपासून बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. वाहतूक संघटनांनी महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीची स्थापना करून शासनाला मागण्यांचे निवेदन दिले आहे. वाढते कर, 'बीओटी' तत्वावरील टोल, रेट्रोफिटमेंट सक्ती, तसेच ई-चलन नियमांतील बदलांमुळे वाहनधारकांवर आर्थिक बोजा वाढत असल्याची तक्रार करण्यात आली.**

# पीएमआरडीए हद्दीत आणखी 74 गावांचे नियोजन एमएसआरडीसीकडे?

## 117 गावांनंतर तिसऱ्या ग्रोथ सेंटरचा प्रस्ताव; नगर नियोजनाऐवजी रस्ते विकास महामंडळाकडे जबाबदारी देण्यावर प्रश्नचिन्ह

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीतील 117 गावांमध्ये उद्योग-व्यवसाय-निवास आदींच्या दोन आराखड्यांचे म्हणजेच विकास केंद्रांचे काम नगर नियोजनाचा कसलाही अर्थाअर्थी संबंध नसलेल्या महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाला देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत असतानाच आता आणखी 74 गावांचे काम रस्ते विकास महामंडळाकडे सोपविण्याचा प्रस्ताव सरकारला पाठविण्यात आला आहे. त्यामुळे हा उंट आणखी किती जागा बळकावणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या म्हणजेच पीएमआरडीएच्या हद्दीतील आठशे गावांच्या विकास आराखड्याच्या प्रक्रियेस न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने सर्व प्रक्रिया करून पूर्ण केलेला हा आराखडाच सरकारने रद्द केला आणि आराखडा करण्याच्या अधिकारालाच आव्हान देण्यात आल्याने 'आराखडा' हा शब्द काढून 'स्ट्रक्चरल प्लॅन' करण्याचा आदेश पीएमआरडीएला दिला. कायद्यानुसार मूळ आराखड्यात पीएमआरडीएच्या हद्दीत विविध ठिकाणी उद्योग-धंदे-निवास-मनोरंजन-शिक्षण आदी सुविधा असलेली अनेक विकास केंद्रे-ग्रोथ सेंटर्स उभारली जाणे अपेक्षित होते. ज्यायोगे लोकसंख्येचे विकेंद्रीकरण टाळून मूळ शहरावरील ताण कमी होईल. परंतु, या स्ट्रक्चरल प्लॅनमध्ये रस्ते आणि काही नागरी सुविधा एवढ्याच बाबींचा समावेश असून, उद्योग-व्यवसायाचा समावेशच नाही. त्यामुळे तेथे राहण्यास येणाऱ्या नागरिकांना रोजगारासाठी मूळ शहराकडेच धाव घ्यावी लागेल.

एकीकडे पीएमआरडीएकडून या अपुऱ्या स्ट्रक्चरल प्लॅनचे नियोजन सुरू असतानाच या आठशे गावांपैकी भोर, हवेली, मुळशी, पुरंदर तालुक्यांतील केवळ 117 गावांसाठीच्या दोन विकास केंद्रांचे नियोजन करण्याचे सरकारी यंत्रणेने ठरविले. मात्र, ते काम पीएमआरडीए किंवा नगर नियोजनाचा अनुभव आणि अभ्यास असणाऱ्या राज्याच्या नगर विकास विभागाकडे न सोपवता चक्क महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडे देण्यात आले. ज्या महामंडळामध्ये रस्ते बांधण्याचा अनुभव-अभ्यास असलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश आणि त्यांचे कामच केवळ रस्ते बांधणे हे आहे, त्यांना नगर नियोजनाचे काम देण्यात हशील काय? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. आता आपल्याकडे हे काम देण्यात येणारच आहे, हे समजल्यावर या महामंडळात संचालक, नगररचना या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. एका सरकारी विभागाची कामे दुसऱ्या महामंडळाला देण्याचा हा प्रकार सुरू असतानाच आता आणखी 74 गावांसाठी तिसऱ्या ग्रोथ सेंटरच्या नियोजनाचा प्रस्ताव रस्ते विकास महामंडळाने राज्य सरकारकडे पाठविला आहे.




### स्ट्रक्चरल प्लॅनमध्ये उद्योगांचा अभाव

» पीएमआरडीएच्या ८१४ गावांसाठी मूळ विकास आराखडा रद्द करून 'स्ट्रक्चरल प्लॅन' करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र या आराखड्यात रस्ते व काही नागरी सुविधा यांनाच प्राधान्य देण्यात आले असून उद्योग-व्यवसायाचा समावेश नाही. त्यामुळे नव्या विकास केंद्रांमध्ये रोजगारनिर्मितीची संधी कमी राहण्याची शक्यता आहे. परिणामी नागरिकांना रोजगारासाठी पुन्हा पुणे शहरावर अवलंबून राहावे लागेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### रिंग रोडलगतचा भाग विकास केंद्रांमध्ये

» रस्ते विकास महामंडळाच्या वर्तुळाकार मार्गाचे म्हणजेच रिंग रोडचे काम सध्या वेगात सुरू आहे. त्यातील पहिल्या टप्प्यातील प्रत्यक्ष काम सुरू झाले असून, दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी भूसंपादनाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. रस्ते विकास महामंडळाकडून उभारण्यात येणाऱ्या या वर्तुळाकार मार्गालगतच ही विकास केंद्रे स्थापन होणार आहेत. त्यामुळेच रस्त्यांबरोबरच ते कामही रस्ते विकास महामंडळालाच देण्यात आल्याचे सांगण्यात येते. वास्तविक, नगर नियोजनाचे काम हे नगर विकास विभागाचे असून, त्या विभागातील तज्ज्ञ अधिकारी ते करू शकतात. केवळ रस्ते बांधण्याचा अनुभव असलेल्या मूळच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांकडून ते कसे पार पडेल, याविषयी साशंकता व्यक्त होत आहे..

### आणखी ७४ गावांचा प्रस्ताव

» ११७ गावांनंतर आता आणखी ७४ गावांसाठी तिसऱ्या ग्रोथ सेंटरचा प्रस्ताव सरकारकडे पाठविण्यात आला आहे. मूळ विकास आराखडा रद्द करून 'स्ट्रक्चरल प्लॅन' तयार करण्याच्या प्रक्रियेत उद्योग-व्यवसायाचा अभाव असल्याची टीका होत आहे. त्यामुळे नव्या विकास केंद्रांमध्ये रोजगारनिर्मिती मर्यादित राहण्याची शक्यता आहे. परिणामी नागरिकांना कामासाठी पुन्हा पुणे शहरावर अवलंबून राहावे लागेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे..

# खडकवासला धरणातून उन्हाळी पाणी पूर्णक्षमतेने सोडले; पुणे व परिसरास पुरवठा

## धरणसाखळीत 17.96 टीएमसी पाणी साठा; शेतीसह पुण्यातील नागरिकांसाठी पाण्याची

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर व परिसरासह जिल्ह्यातील हजारो हेक्टर शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातून शेतीसाठी उन्हाळी आवर्तनाचे पाणी 1103 क्युसेक वेगाने पूर्णक्षमतेने सोडले जात आहे. त्यामुळे गेल्या दहा दिवसांत धरणसाखळीत 0.81 इतकी पाण्याची घट झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत धरणसाखळीत 0.76 टीएमसी इतका जादा पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी 27 फेबुवारी 2026 रोजी खडकवासला धरणसाखळीत 17.20 टीएमसी म्हणजे 59.00 टक्के इतका पाणीसाठा होता, तर यंदा आजच्या दिवशी 27 फेबुवारी रोजी 17.96 टीएमसी म्हणजे 61.61 टक्के इतका पाणीसाठा आहे.

17 फेबुवारीपासून खडकवासला धरणातून मुठा कालव्यात पूर्णक्षमतेने पाणी सोडण्यात येत आहे. खडकवासलापासून 202 किलोमीटर अंतराच्या मुठा कालव्यातून इंदापूर तालुक्यातील शेवटच्या टोकाला पाणी पोहोचल्याचे खडकवासला धरण जलसंपदा विभागाच्या शाखा अभियंता गिरिजा कल्याणकर यांनी सांगितले.

हवेली, दौंड, इंदापूर आदी तालुक्यांतील हजारो हेक्टर शेतीला उन्हाळी आवर्तनाचे पाणी सोडण्यात येणार आहे. त्यासाठी खडकवासला धरणातून मुठा कालव्यात पाणी सोडण्यात येत असल्याने मुठा कालवा दुथडी भरून वाहत आहे. याशिवाय पुणे शहर व परिसराला पिण्यासाठी पूर्णक्षमतेने पाणी सोडण्यात येत आहे. खडकवासला धरणसाखळीतील चार धरणांची एकूण पाणी साठवणक्षमता 29.15 टीएमसी इतकी आहे. रब्बी आवर्तनाचे पाणी 10 फेबुवारी रोजी सोडणे बंद करण्यात आले.




### पाणीसाठा ६१.६१ टक्क्यांवर

» खडकवासला धरणसाखळीतून उन्हाळी आवर्तनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात झाल्याने जिल्ह्यातील शेतीला मोठा दिलासा मिळाला आहे. 1103 क्युसेक वेगाने मुठा कालव्यातून पाणी सोडले जात असून ते इंदापूरपर्यंत पोहोचले आहे. हवेली, दौंड व इंदापूर तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्राला याचा फायदा होणार आहे. सध्या धरणसाखळीत 17.96 टीएमसी म्हणजे 61.61 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे, जो मागील वर्षाच्या तुलनेत अधिक आहे. पुणे शहरासह परिसरातील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचाही पुरवठा सुरळीत ठेवण्यात येत असून प्रशासनाने उन्हाळ्यातील गरज लक्षात घेऊन नियोजन सुरू ठेवले आहे.